**महाराष्ट्र शिक्षण सेवा (शिक्षण सक्षमीकरण शाखा) गट-अ मधील अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यामध्ये अंशत: बदल करण्याबाबत - जेष्ठ अधिव्याख्याता**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन आदेश क्रमांक : बदली ३११९/प्र.क्र. ४०/प्रशा-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २९ ऑगस्ट, २०१९

वाचा :- शासनाचे समक्रमाकांचे दिनांक २९ मे, २०१९ रोजीचे शासन आदेश

**शासन आदेश-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार दिनांक ३१ मे, २०१९ रोजी तीन वर्षाचा कालावधी पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश दिनांक २९ मे, २०१९ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. त्यामध्ये काही अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेत अंशत: बदल करण्याचा निर्णय शासन स्तरावरून घेण्यात आला आहे. खालील तक्त्यात नमूद अधिकाऱ्यांची बदलीने त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक-४ मध्ये दर्शविलेल्या पदावर सुधारीत पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव व पदनाम | दिनांक २९.५.२०१९ अन्वये करण्यात आलेली पदस्थापना | सुधारीत पदस्थापना | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्रीमती हर्षलता वसंतराव बुराडे, वरिष्ठ अधिव्याख्याता जि.शै.सा.व्या.वि.सं. अमरावती | वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जि. यवतमाळ | वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जि. नागपूर | रिक्त पदावर |
| २ | श्रीमती अंजली सतिश रसाळ, वरिष्ठ अधिव्याख्याता जि.शै.सा.व्या.वि.सं. सांगली | वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जि. रत्नागिरी | वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जि. सांगली | १ वर्ष मुदतववाढ |

| अ. क्र. | नाव व पदनाम | दिनांक २९.५.२०१९ अन्वये करण्यात आलेली पदस्थापना | सुधारीत पदस्थापना | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ३. | श्री. भगवान निवृत्ती खारके, वरिष्ठ अधिव्याख्याता जि.शै.सा.व्या.वि.सं. नाशिक | वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जि. ठाणे | वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जि. अहमदनगर | रिक्त पदावर |

२. सदर अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा पदभार त्वरित स्विकारावा तसेच त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. सदर आदेश सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत. वरील अधिकारी हे शासन आदेश दिनांक २९ मे, २०१९ अन्वये करण्यात आलेल्या बदलीच्या ठिकाणी पदावर रूजू झाले असल्यास हे आदेश अंमलात येणार नाहीत.

३. आयुक्त (शिक्षण), पुणे यांनी दिनांक २९ मे, २०१९ रोजीच्या आदेशाप्रमाणे सदर अधिकाऱ्यांना त्यांच्या सध्याच्या पदावरून कार्यमुक्त करण्याचे आदेश निर्गमित केले असल्यास, उक्त परिच्छेद क्र. २ विचारात घेऊन ते रद्द करण्यात यावे. संबंधित अधिकाऱ्यांचे वरीलप्रमाणे यथोचित आदेश निर्गमित करावेत. बदली झालेले अधिकारी विहित कालावधीत दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होतील, याची खातरजमा करावी व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२९१६०११४१३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Santosh Basaveshwar Mamadapure

Digitally signed by Santosh Basaveshwar Mamadapure
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3bfe111652996d95372924b1d22cdf88b33dfa2a3de3d8ea011b7d83adc40cb6, serialNumber=557abe7a7194ec5ddc74df537d7d57a9dbda20b1937a2e41983c35f6a38b6ad8, cn=Santosh Basaveshwar Mamadapure
Date: 2019.08.29 16:08:36 +05'30'

**( संतोष ममदापुरे )**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) आयुक्त, शिक्षण आयुक्तालय (मध्यवर्ती इमारत),महाराष्ट्र राज्य, पुणे
२) सर्व शिक्षण संचालके
३) संबंधित प्राचार्य, महाराष्ट्र शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था
४) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
५) संबंधित अधिकारी (आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयामार्फत)

**प्रत माहितीसाठी,**

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी.

२) अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक

३) निवडनस्ती, प्रशा-२.